# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

अति-आयुक्त यांचे कार्यालय,
जा.क्र.मनपा/अति-आयुक्त/१०७/२०२१-२२
दि.१०/०३/२०२२

**विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात "वन महोत्सव" कार्यक्रमाचे नियोजन करणेबाबत.**

**कार्यालयीन आदेश**

माझी वसुंधरा अभियानातंर्गत मिरा भाईंदर शहरामध्ये "वन महोत्सव" कार्यक्रम दि.११,१२ व १३ मार्च २०२२ रोजी स्व.बाळासाहेब ठाकरे मैदान, इंद्रलोक, भाईंदर (पू.) येथे आयोजित करण्यात आलेला आहे. वन महोत्सव कार्यक्रमाचे उद्घाटन सोहळा शुक्रवार दि.११ मार्च २०२२ रोजी सायं ०६.४५ वाजता करुन रात्री १० पर्यत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे. तसेच दि.१३ मार्च २०२२ रोजी सायं ०७ वाजता वन महोत्सव कार्यक्रमाचा समारोह करण्यात येणार आहे.

सदर कार्यक्रम नियोजितपणे पार पाडण्याकरीता आपली पुढीलप्रमाणे कामकाजासाठी नेमणूक करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अधिका-यांचे नाव |
|---|---|---|
| १. | १. निमंत्रकांची व्यवस्था<br>२. फोटो / विडीओ शुटींग व्यवस्थापन<br>३. मान्यवरांसाठी तुळशीचे रोपटे, सन्मानचिन्ह<br>४. वनमहोत्सव कार्यक्रमाकरता स्वयंसेवकांची नेमणुक करणे.<br>५. मान्यवरांसाठी चहा नास्ता | श्री. हंसराज मेश्राम. (उप.मुख्य उद्यान अधिक्षक प्रभाग क्र. १,२ व ३) |
| २. | १. मंच व्यवस्थापन<br>२. पाहुण्यांचे स्वागत<br>३. गर्दी नियंत्रित करण्याची व्यवस्था<br>४. कार्यक्रमास्थळी पार्किंगची व्यवस्था<br>५. फलक / बॅनर्सची व्यवस्था | श्री. नागेश विरकर. (उप.मुख्य उद्यान अधिक्षक प्रभाग.क्र. ४,५ व ६) |
| ३. | स्टॉल निहाय विद्युत पुरवठा करणे. व सुरळीत विद्युत व्यवस्था ठेवणे. | श्री. उत्तम रणदिवे, (कनिष्ठ अभियंता) |
| ४. | १. कार्यक्रमाचे Facebook Live, YouTube Live करणे. (कार्यक्रमाची प्रसिध्दी)<br>२. गार्डन वेबसाईट चे ऑनलाईन उद्घाटन करण्याची तयारी करणे.<br>३. कार्यक्रमास्थळी LED स्क्रिन ठेवणे. | श्री. राज घरत, (सिस्टिम मॅनेजर) |
| ५. | स्वच्छता साफ-सफाई, पोर्टेबल टॉयलेटची व्यवस्था करणे. | डॉ.सचिन बच्छाव, सहा.आयुक्त (आरोग्य)<br>श्री.रवी पाटील, (स्वच्छता निरीक्षक) |
| ६. | वैद्यकीय पथक व रुग्णवाहिकेची व्यवस्था | डॉ. नंदकिशोर लहाने,<br>(प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी) |

| | | |
|---|---|---|
| ७. | कार्यक्रम ठिकाणी अग्निशमन वाहन व अग्निशमन कर्मचारी यांची व्यवस्था करणे. | श्री. प्रकाश बोराडे.<br>(प्र.मुख्य अग्निशमन अधिकारी) |
| ८. | सुरक्षा रक्षकांची व्यवस्था करणे. | श्री. सुनिल यादव.<br>(सहा.आयुक्त, सुरक्षा विभाग) |
| ९. | कार्यक्रमाच्या ठिकाणी आवश्यकतेप्रमाणे व्यवस्था/ नियोजन करणे. | श्रीम.कांचन गायकवाड.<br>(प्रभाग क्षेत्र अधिकारी प्र.क्र.०४) |

उपरोक्त कार्यक्रमाचे महत्व लक्षात घेऊन प्रत्येक अधिकारी व कर्मचारी यांनी त्यांचेकडे सोपविण्यात आलेली सर्व कामे नैतिक व वैयक्तिक जबाबदारी समजून करावयाची आहेत. त्यामध्ये कोणत्याही प्रकारची हयगय अथवा टाळाटाळ करू नये याची दक्षता घ्यावी.

(विजयकुमार म्हसाळ)
अति-आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत माहितीस्तव :-
मा.आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका